महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३१

# बडोद्याचे जनरल : नानासाहेब शिंदे

देवदत्त कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३१

# बडोद्याचे जनरल : नानासाहेब शिंदे

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

बडोद्याचे जनरल :
नानासाहेब शिंदे
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ५१
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११३
८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५५ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/**
  **101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/**
  **1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# बडोद्याचे जनरल :
# नानासाहेब शिंदे

महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारताच्या इतिहासातील एक पथदर्शक राज्यकर्ते होते. त्यांनी आपल्या ५८ वर्षांच्या कारकिर्दीत प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण कामाचा 'भारतीय मानदंड' तयार केला. हा मानदंड तयार करत असताना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला ज्ञान, गुणवत्ता आणि शिस्त यांचे अधिष्ठान दिले. त्याचप्रमाणे योग्य ठिकाणी योग्य व्यक्तींची निवड अतिशय काळजीपूर्वक केली. निवड केलेल्या लोकांना गुणवत्तापूर्ण कामासाठी पुरेसा अवकाश दिला. महत्त्वाचे म्हणजे या अधिकाऱ्यांच्या गुणांची पारख करून त्यांच्या क्षमतांचा विकास होईल असे धोरण राबवले. अधिकाऱ्यांना कामातील शिस्तीबरोबर अभ्यासाची आणि वाचनाची सवय लावली. परिणामी त्यांच्या नियमित कामाबरोबरच त्यांच्याकडून अनेक क्षेत्रात समाजोपयोगी कामे झाली. सयाजीरावांच्या सहवासात आलेले अनेकजण चांगले वाचक झाले. त्यांनी उत्तम वैयक्तिक

ग्रंथसंग्रह केला. विशेष म्हणजे त्यापैकी काही उत्तम लेखक म्हणून लौकिक प्राप्त झाले. यापैकी रियासतकार सरदेसाई यांचे उदाहरण पुरेसे बोलके आहे.

रियासतकारांप्रमाणेच नानासाहेब शिंदे यांचे व्यक्तिमत्त्वसुद्धा सयाजीरावांच्या सहवासात 'बहरले'. त्यातूनच लष्करातील सर्वोच्च असणाऱ्या 'जनरल' या पदावर नियुक्त होणारे भारतातील कोणत्याही प्रदेशातील ते पहिले भारतीय अधिकारी ठरले. बडोद्यातील साहित्यविषयक चळवळीत संपतराव गायकवाड यांच्याबरोबर नानासाहेब शिंदे यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांनी एकूण १५ स्वतंत्र ग्रंथांचे लेखनसुद्धा केले. लष्करासारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीकडून एवढे लेखन हा अपवाद आहे. ब्रिटिश भारतातील आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील लष्करी अधिकारी आणि मुख्यतः जनरलसारख्या सर्वोच्च पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांशी तुलना करता नानासाहेबांएवढे ग्रंथ नावावर असणारा एकही लष्करी अधिकारी दिसत नाही. यातच सयाजीरावांच्या नेतृत्वाची आणि नानासाहेबांच्या कर्तृत्वाची प्रचीती येते.

## पूर्वपीठिका

सतराव्या शतकात विजापूर दरबारात सरदार असणाऱ्या शिंदे घराण्याच्या मूळ पुरुषाला त्याने गाजवलेल्या पराक्रमाचे बक्षीस म्हणून आदिलशहाने रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण प्रांतात मोठी जहागिरी दिली. या जहागिरीत चिपळूण तालुक्यातील

पेडांबे, कळकवणी, खलपोली, नांदविसे, कोळकवाडी, तिवरे, कादवड, शिरगाव, मोरवणे व रिकटोली या गावांचा समावेश होता. यापैकी पेडांबे व कळकवणी ही गावे वतनाची मूळ जागा मानली जाई. या दहा गावांमधील शिंदे हे 'दसपटीचे शिंदे मोकाशी इनामदार' म्हणून ओळखले जात. या दसपटीच्या जहागिरीची जागा मानले जाणारे पेडांबे हे नानासाहेबांचे मूळ गाव होते.

पेडांबे येथील पारंपरिक वतने गहाण पडल्यानंतर कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याच्या उद्देशाने नानासाहेबांचे वडील गणपतराव हे ठाण्यास येऊन पोलिसात नोकरी करू लागले. गणपतरावांचे एक मोठे बंधू पेडांब्यास राहून शेती करत लहान बंधू ठाण्यातील कोर्टात नोकरी करत होते. तर नानासाहेबांची आई तळेबीडच्या मोहिते घराण्यातील होती.

नानासाहेबांचा जन्म १८७५ मध्ये सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात वाजेगाव येथे मावशीच्या घरी झाला. त्यांच्या जन्माची तारीख अथवा वेळ कोणीच नोंदवून न ठेवल्याने नानासाहेबांना आपली जन्मतारीख आयुष्यभर कळली नाही. तर वडिलांनी जन्मसाल बरोबर सांगितल्याने ते लक्षात राहिल्याचे नानासाहेबांनी नोंदवले आहे. नानासाहेबांचे मूळ नाव दाजीसाहेब असे होते. परंतु त्यांची आत्या त्यांना 'नाना' या नावाने हाक मारत असल्यामुळे पुढे तेच नाव रूढ झाले. नानासाहेब १० वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले.

## बालपण

आईच्या निधनानंतर वडिलांनी नानासाहेब आणि त्यांचे छोटे बंधू रामचंद्र यांना शिक्षणासाठी सुपे येथील आपल्या मुलीकडे पाठवले. निरक्षर वडिलांची प्रेरणा आणि त्यांची कथा-कीर्तने ऐकण्याची आवड यामुळे नानासाहेबांनी १३ वर्षाचे होईपर्यंत बरेच प्राकृत ग्रंथ वाचले होते. सुप्यात काही काळ शिक्षण घेतल्यानंतर नानासाहेबांचे वडील आपल्या दोन्ही मुलांना शिक्षणासाठी भिवंडीला घेऊ गेले. त्यावेळी नानासाहेब सहावीमध्ये शिकत होते. सहावीच्या वर्गात ते एकटेच मराठा विद्यार्थी होते. इतर सर्व विद्यार्थी ब्राह्मण-प्रभू जातीचे आणि त्यांच्यापेक्षा वयाने मोठे होते. नानासाहेबांचा मराठी भाषा, व्याकरण, गणित, इतिहास व भूगोल या विषयांचा अभ्यास चांगला होता. यावेळी बरेच ब्राह्मण विद्यार्थी गणित शिकण्यासाठी आपल्या घरी येत असल्याची आठवण नानासाहेबांनी आपल्या आत्मचरित्रात नोंदवली आहे.

मार्च १८८९ मध्ये मोठ्या बहिणीचे दीर सदाशिवराव भिवंडीला आले असता त्यांनी इंग्रजी शिकण्यासाठी स्वतःबरोबर बडोद्यास येण्याबाबत नानासाहेबांना विचारले. मोठ्या बहिणीचे पती बाबूराव चव्हाण हे बडोद्याच्या सर्व्हे खात्यात नोकरीस होते. तर सदाशिवराव मॅट्रिकच्या परीक्षेचा अभ्यास करत होते. त्यांच्या वडिलांची परवानगी मिळाल्यानंतर सदाशिवराव नानासाहेबांना घेऊन बडोद्यास गेले.

## बडोद्यातील शिक्षण

१ एप्रिल १८८९ रोजी सदाशिवरावांनी नानासाहेबांना बडोद्यातील बॅच स्कूलमध्ये इंग्रजी पहिलीच्या वर्गात दाखल केले. या वर्गात मराठ्यांची १८ मुले शिक्षण घेत होती. सातत्यपूर्ण अभ्यास करणाऱ्या नानासाहेबांनी आपले शिक्षक देव मास्तरांच्या सांगण्यानुसार अभ्यास करत ६ महिन्यांमध्येच दुसरीची परीक्षा उत्तीर्ण होत तिसऱ्या इयत्तेत प्रवेश मिळविला. त्यावेळी नानासाहेब सदाशिवरावांबरोबर त्यांच्या खोलीत राहत होते. दुर्दैवाने पुढील वर्षभरात सदाशिवरावांचे निधन झाले.

१८९२ मध्ये इंग्रजी पाचव्या इयत्तेत प्रवेश घेतल्यानंतर नानासाहेब बडोदा कॉलेजच्या बोर्डिंगमध्ये राहत होते. या बोर्डिंगमध्ये बडोदा कॉलेज आणि हायस्कूलची मुले राहत असत. यावेळी बोर्डिंगमधील निवास व भोजनासह संपूर्ण शिक्षणाचा खर्च दरमहा १५ रु. इतका अत्यल्प येत असल्याचे निरीक्षण नानासाहेबांनी मांडले आहे. बडोदा संस्थानचे शिक्षण आयुक्त म्हणून निवृत्त झालेले श्री. एन.के. दीक्षित यांचे माध्यमिक शिक्षण ब्रिटिश भारतातील सुरतमध्ये व महाविद्यालयीन शिक्षण बडोदा कॉलेजमध्ये झाले होते. 'बडोदा कॉलेजची फी सुरतमधील हायस्कूलपेक्षा कमी असून आपण बडोद्यातील महाविद्यालयीन शिक्षणासाठी ब्रिटिश भारतातील हायस्कूलपेक्षा कमी फी भरल्याची' आठवण दीक्षित यांनीदेखील नोंदवली आहे.

त्याचबरोबर बडोदा कॉलेजच्या बोर्डिंगमध्ये कोणीही मनात येईल तेथे जेवावयास बसत असे. १८९५ मध्ये बडोदा कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये सर्व जातींचे विद्यार्थी कोणतीही जातीय बंधने न पाळता एकत्र राहत असल्याची आठवण नानासाहेबांनी बडोदा कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवी स्मारक ग्रंथात नोंदवली आहे. याउलट १८९६ मध्ये कोल्हापुरातील राजाराम कॉलेजमध्ये फक्त ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठीचे वसतिगृह सुरू करण्यात आले होते. याव्यतिरिक्त १८९६ मध्येच छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुरात सर्व जातींसाठी एकत्र वसतिगृह सुरू केले होते; परंतु तो प्रयत्न अयशस्वी ठरला. त्यामुळे शाहू महाराजांना १९०१ नंतर आपल्या संस्थानात प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र २३ वसतिगृहांची स्थापना करावी लागली.

## बडोदा फौजेत भरती

१८९५ मध्ये नानासाहेब मॅट्रिक आणि स्कूल फायनल अशा दोन्ही परीक्षा एकाचवेळी उत्तीर्ण झाले. मराठा जातीतील विद्यार्थी दोन्ही परीक्षा एकाच वेळी उत्तीर्ण होणे ही त्याकाळात खूप मोठी गोष्ट होती. संस्थानच्या लष्करात अधिकारी पदावर नियुक्त करण्यासाठी सयाजीराव महाराज मॅट्रिक उत्तीर्ण मराठा विद्यार्थ्यांच्या शोधात होते. त्यावेळी बाबूराव चव्हाणांचे स्नेही असणाऱ्या कोल्हापूरच्या लेफ्टनंट विठ्ठलराव गायकवाड यांनी बडोदा फौजेचे सेनापती आनंदराव गायकवाड यांच्याजवळ नानासाहेबांचे कौतुक केले. दुसऱ्या दिवशी नानासाहेबांसह

एकूण ३ मराठा विद्यार्थ्यांना सयाजीराव महाराजांसमोर नेण्यात आले. त्यावेळचा प्रसंग सांगताना नानासाहेब लिहितात, "... त्यांच्याशी थोडा वेळ बोलणे संपल्यावर शेवटी मला बोलावले. मी माझे नाव सांगताच यंदाच्या मॅट्रिक व स्कूल फायनलमध्ये पास झालेले तुम्हीच का? असा महाराजांनी मला पहिलाच प्रश्न केला. कितीपर्यंत तुमची शिकण्याची उमेद आहे, असे विचारताच बी.ए., एल.एल.बी. होण्याची माझी इच्छा आहे, असे मी सांगितले. "मग पुढे काय करणार", असा प्रश्न होताच "वकिली करणार" म्हणून मी सांगितले. हे ऐकून महाराजसाहेब थोडेसे हसले. मला काय काय खेळ येतात, घोड्यावर बसता येते की नाही, लष्करात नोकरी करणे आवडते की काय, वगैरे आणखी काही प्रश्न केले. तेथून मी परत कॉलेजमध्ये आलो. यापूर्वी मी महाराज साहेबांना पुष्कळ वेळा लांबून पाहिले होते. परंतु बोलण्याचा हा पहिलाच प्रसंग.

फेब्रुवारी तारीख ६ रोजी शनिवारी मी प्रो. लिटललडेल यांचे Hereward the wake या पुस्तकावर लेक्चर ऐकत पी.ई. च्या वर्गात बसलो असताना तेथे माझ्या नावाचा एक लखोटा आला. तो उघडून पाहता मला रुपये ६० वर मोठ्या खासपागेत अट्टयाची नेमल्याबद्दलचा हुकुम होता." ८ फेब्रुवारी १८९५ रोजी नानासाहेब खासपागेत नोकरीवर रुजू झाले. यावेळी मराठा उमेदवारांच्या भरतीमागील सयाजीराव महाराजांची भूमिका स्पष्ट करताना

नानासाहेब लिहितात, “शिकलेल्या मराठा तरुणांची फौजेत भरती करून वरिष्ठ दर्जाच्या जागा त्यांना देण्याच्या हेतूने महाराज साहेबांनी ही भरती त्यावेळी सुरू केली होती. फौजेतील हे हिंदीकरण श्री. सयाजीराव महाराज साहेबांनी चाळीस वर्षांपूर्वी सुरू केले.” पुढे ४१ वर्षे नानासाहेबांनी बडोदा लष्करात नोकरी केली.

## बडोदा लष्करात महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या

नोकरीस लागल्यानंतर एक वर्षातच एप्रिल १८९६ मध्ये नानासाहेबांचा विवाह त्यांचे मेहुणे बाबूराव चव्हाणांच्या बहिणीच्या मुलीशी झाला. विवाहानंतर दोनच महिन्यात नानासाहेब केशवराव सावंत आणि दिनकरराव शिर्के या मित्रांसह लेफ्टनंटच्या परीक्षेला बसले. या परीक्षेचा अभ्यास करताना नानासाहेब आणि केशवरावांनी एकत्रितपणे इंग्रजी पुस्तकावरून टिपणे तयार केली होती. १०-१२ वर्षांनंतर फौज खात्यातील कवायती कारखान्याचे नियम तयार करण्याची जबाबदारी खात्याने सोपवली असता हीच टिपणे जशीच्या तशीच त्या नियमांमध्ये समाविष्ट करण्यात आल्याचे नानासाहेब आपल्या आत्मचरित्रात सांगतात. केशवराव, दिनकरराव आणि नानासाहेब हे तिघेही मित्र यावेळी लेफ्टनंटची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांची दरमहा १६५ रु. पगारावर लेफ्टनंट पदावर नियुक्ती करण्यात आली.

१८९८ मध्ये आफ्रिकेतील बोअर लोकांबरोबर चालू असलेल्या युद्धात ब्रिटिश सरकारला सहकार्य म्हणून घोडे पाठविण्याचे भारतीय राजांनी कबूल केले. त्यानुसार सयाजीराव महाराजांकडून ब्रिटिश सरकारला १०८ घोडे देण्यात आले. ब्रिटिश लष्करी अधिकारी कर्नल मॉंटिथ यांनी पसंत केलेले बडोदा फौजेतील घोडे मुंबईस नेऊन जनरल सर रॉबर्ट लो यांना सुपूर्द करण्याची जबाबदारी नानासाहेबांवर सोपवण्यात आली. त्यानुसार नानासाहेब स्पेशल ट्रेनने घोड्यांना घेऊन मुंबईला गेले. घोडे घेऊन आफ्रिकेला जाणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्याला इंग्रजीव्यतिरिक्त अन्य कोणतीही भाषा येत नव्हती. अशा परिस्थितीत या अधिकाऱ्याबरोबर जाण्यासाठी अन्य इंग्रजी जाणणारा अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे ऐनवेळी नानासाहेबांना आफ्रिकेत जाण्याची संधी निर्माण झाली; परंतु सयाजीराव महाराजांचा आदेश नसल्यामुळे नानासाहेब त्यावेळी आफ्रिकेला जाऊ शकले नाहीत.

१९०० मध्ये बडोद्यात मोठ्या खासपागेत कार्यरत असताना नानासाहेब तापाने आजारी पडले. सुमारे ४२ दिवसांच्या डॉ. परांजपेंच्या उपचारानंतर नानासाहेब बरे झाले. या आजारपणात औषधोपचारास आवश्यक खर्चासाठी त्यांना थोडे कर्ज काढावे लागले. ही हकीकत कळताच सयाजीराव महाराजांनी फौजेकरिता स्वतंत्र मिलिटरी मेडिकल ऑफिसर नेमून लष्करी अंमलदार आणि त्यांच्या कुटुंबीयांना कायमस्वरूपी मोफत

उपचार करण्याचा आदेश दिला. ही व्यवस्था पुढे बडोद्यात अखंडित चालू राहिली. याच वर्षी नानासाहेब फौजेस आवश्यक घोडे खरेदी करण्यासाठी मुंबईला गेले असता बडोद्यात त्यांच्या वडिलांचे निधन झाले. दुसऱ्या दिवशी परतलेल्या नानासाहेबांनी वडिलांचे उर्वरित अंत्यविधी केले.

याचदरम्यान कडी प्रांतातील पिलवाई गावातील राजपुतांनी केलेले बंड मोडून काढण्यासाठी बडोद्याहून फौज पाठविण्यात आली; परंतु या फौजेत नानासाहेबांच्या रिसाल्याचा समावेश नसल्यामुळे त्यांना पिलवाईस जाता आले नाही; परंतु बडोद्याच्या फौजेने एकाच दिवसात हे बंड मोडून काढले. या लढाईत बडोदा फौजेतील एक-दोन शिपाई जखमी झाले; परंतु जीवितहानी झाली नाही.

तरुण हुशार अंमलदारांना रिसाल्याबरोबरच पलटणीचीही माहिती व्हावी या उद्देशाने १ नोव्हेंबर १९०१ रोजी सयाजीराव महाराजांनी नानासाहेबांची ७ वर्षांच्या नोकरीनंतर मोठ्या खासपागेतून पहिल्या पलटणीमध्ये अॅडज्युटंटपदी बदली केली. या पलटणीमध्ये कार्यरत लेफ्टनंट रंगय्या वर्धय्या या मद्रासी गृहस्थांनी नानासाहेबांना पलटणची परेड शिकवली. या पलटणीच्या कॅप्टनपदी नियुक्ती झालेले श्री. वॉटसन यांचे इंग्रजी शिक्षण इंग्लंडमध्ये झाले होते. कॅप्टन वॉटसन आणि नानासाहेब एकमेकांशेजारी राहत असल्यामुळे रोज रात्री वॉटसन साहेब नानासाहेबांना आपल्या घरी बोलावून लष्करी वाङ्मयावरील

इंग्रजी पुस्तके वाचायला लावत आणि स्वतः एका लोखंडी खाटेवर पडून ऐकत. नानासाहेबांनी वाचलेला भाग ते त्यांना समजावून सांगत. चार वर्षांच्या सहवासात वॉटसन यांनी सेनापती कचेरीच्या लायब्ररीतील लष्करी वाङ्मयावरील बहुतेक सर्व पुस्तके आपल्याकडून वाचून घेतल्याची आठवण नानासाहेबांनी नोंदवली आहे. याच वॉटसन साहेबांनी आपल्या तीन मुलांच्या नावावर बँकेत सेव्हिंग खाते काढून आपल्याला बचतीची सवय लावल्याचेदेखील नानासाहेब सांगतात.

नानासाहेबांची पलटणीत बदली झाल्यानंतर त्यांना पलटणीची परीक्षा उत्तीर्ण होण्याचा आदेश देण्यात आला. त्याअगोदर अनेक अधिकाऱ्यांची पलटणीतून रिसाल्यात आणि रिसाल्यातून पलटणीत बदली होत असे. परंतु त्यांना ही परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करण्यात आली नव्हती. नानासाहेबांपासून प्रत्येक अंमलदाराला पुढील पदोन्नतीसाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले.

## बडोद्यातील पोलो खेळाची 'पायाभरणी'

पोलो खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी सयाजीराव महाराजांनी पोलो कारखाना हुजराती पागेपासून स्वतंत्र करून त्याच्या देखभालीसाठी समिती नेमली. कॅप्टन जनार्दन सदाशिव हे पोलो कारखान्याचे सेक्रेटरी होते. परंतु त्यांच्या घरापासून पोलो खेळण्याची जागा आणि पोलोच्या घोड्यांचा कारखाना लांब असल्यामुळे कॅप्टन जनार्दन सदाशिव यांना कारखान्याची

देखरेख करणे शक्य होत नव्हते. शेवटी त्यांच्या शिफारशीनुसार नानासाहेबांची सेक्रेटरीपदी नेमणूक करण्यात आली. याच दरम्यान ऑक्सफर्ड येथून शिक्षण संपवून परतलेल्या युवराज फत्तेसिंगरावांना पोलोची आवड असल्यामुळे बडोद्यात हा खेळ रोज खेळला जाऊ लागला.

फत्तेसिंगरावांनी सयाजीराव महाराजांना विनंती करून पोलो खेळणाऱ्यांसाठी १६ नवीन चांगले घोडे खरेदी केले, तर स्वत:साठी ४ भारी किमतीचे घोडे मागवले. रोजच्या सरावामुळे युवराज फत्तेसिंगराव, नानासाहेब, कॅप्टन जनार्दन, कॅप्टन दादासाहेब गायकवाड, सरदार ताजमहंमद, अप्पासाहेब सावंत, बलदेवप्रसाद पाठक, माधवराव जाधव व भाऊसाहेब गायकवाड या पोलो खेळाडूंचा चांगला संघ तयार झाला. १९०२ मध्ये दक्षिण आफ्रिकेतून भारतात आलेल्या १० रॉयल युरोपियन रिसाल्याच्या पोलो टीमशी सामना खेळण्याकरिता सयाजीराव महाराजांनी बडोद्याकडून हा संघ पाठवला.

१९०३ व १९०४ मध्ये पुणे येथे झालेल्या पोलोच्या सामन्यांमध्ये भाग घेण्यासाठी फत्तेसिंगराव बडोद्याची पोलो टीम घेऊन गेले. दोन्ही वर्षी बडोदा संघाला पराभव पत्करावा लागला. या दौऱ्यादरम्यान युवराज फत्तेसिंगराव आपल्या संघापासून वेगळ्या ठिकाणी राहत. त्यांच्या वास्तव्यादरम्यान अनेक युरोपियन अंमलदार त्यांचे मित्र बनले होते. एके दिवशी पुणे जिमखान्यात फत्तेसिंगराव आणि त्यांच्या युरोपियन

मित्रांमध्ये वाद झाला. त्यामुळे पुण्यातील युरोपियन मंडळींमध्ये खळबळ उडाली. ही बाब सयाजीराव महाराजांच्या कानावर गेली. पोलोचा संघ बडोद्याला परतल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात आली.

पुण्यात युवराज इतर संघापासून वेगळे वास्तव्यास असल्याने या प्रकरणाशी इतरांचा संबंध नव्हता; परंतु बडोद्यातील चौकशीदरम्यान संपूर्ण संघाला या प्रकरणासंदर्भात दोष देण्यात आला. याचे वाईट वाटल्यामुळे नानासाहेबांनी सेक्रेटरीपदाचा राजीनामा दिला. कालांतराने नानासाहेबांप्रमाणेच अन्य सदस्यांनीही पोलो खेळातून अंग काढून घेतले. परिणामी फत्तेसिंगरावांच्या मृत्यूनंतर पोलोचा कारखाना बंद करण्यात आला. पुढे १९२४ मध्ये नानासाहेब ऑफिशिएटिंग जनरल पदावर कार्यरत असताना महाराजांच्या आज्ञेने त्यांच्या नेतृत्वाखाली पोलोचा कारखाना पुन्हा सुरू करण्यात आला. नानासाहेब आणि मेजर भाऊसाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली फत्तेसिंगरावांचे पुत्र प्रतापसिंह उत्तम पोलो खेळण्यास शिकले.

## बडोदा राजपरिवार आणि नानासाहेब

१६ डिसेंबर १९०४ रोजी नानासाहेबांच्या सात वर्षांच्या मुलाचे तापाच्या आजाराने निधन झाले. या मुलावर फत्तेसिंगरावांचा विशेष जीव होता. यावेळी नानासाहेबांचे सांत्वन करताना फत्तेसिंगराव म्हणाले, “शिंदे, माझा मुलगा आज वारला. मला त्याबद्दल किती दु:ख होत आहे हे सांगता येत नाही.”

फत्तेसिंगरावांबरोबरच खासेराव जाधव व अन्य मित्रमंडळींनीही नानासाहेबांचे सांत्वन केले. २ महिन्यांनंतर फेब्रुवारी १९०५ मध्ये नानासाहेबांना भेटायला आलेल्या नारायणराव घाडगेंनी 'तुम्ही आजकाल राजवाड्यावर येत नसल्यामुळे महाराज सतत तुमची आठवण काढतात, तरी तुम्ही महाराजांना वरचेवर भेटणे गरजेचे असल्या'चे सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी नानासाहेबांना राजवाड्यावर महाराजांसोबत जेवणास हजर राहण्याचे आमंत्रण आले. हा प्रसंग वर्णन करताना नानासाहेब लिहितात, "मी राजमहालात गेलो. मला पाहताच महाराजसाहेब म्हणाले की, "अहो रावसाहेब, आपली स्वारी जिवंत आहे का? तुम्ही लोकांनी इतके Thin Skinned असू नये. तुमच्यासारख्या तरुण मंडळीचा आम्हास फार उपयोग करून घ्यावयाचा आहे. माझा बेत तुम्हास विलायतेस अगर जपानास लष्करी शिक्षण घेण्यास पाठवण्याचा आहे." सातच महिन्यांनंतर सप्टेंबर १९०५ मध्ये नानासाहेबांना ही संधी चालून आली.

## फौजेचे मनुव्हर्स (लष्करी संचलन)

नानासाहेबांनी महाराजांची भेट घेतली त्याच दिवशी सकाळी नानासाहेबांना त्यांच्या ग्वाल्हेर मिलिटरी स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या धाकट्या बंधूंचे पत्र आले होते. '१५ फेब्रुवारीपासून ग्वाल्हेरच्या फौजेचे मोठे मनुव्हर्स (लष्करी संचलन) चालू होणार असून ते पाहण्यास आपण काही ऑफिसर घेऊन यावे' असे त्यांनी लिहिले होते. ही गोष्ट नानासाहेबांनी महाराजांच्या

कानावर घातली. महाराजांनी सोबत कोणत्या अधिकाऱ्यांना नेणार असल्याचे नानासाहेबांना विचारले. तेव्हा नानासाहेबांनी कॅप्टन जनार्दन सदाशिव व लेफ्टनंट केशवराव सावंत यांची नावे सुचवली. त्यानुसार जेवण संपताच सयाजीरावांनी लगेच ग्वाल्हेरच्या शिंदे महाराजांना आपले अधिकारी पाठविण्यासंदर्भात तार करण्याचा आदेश सेक्रेटरीला दिला. दुसऱ्या दिवशी शिंदे महाराजांचे उत्तर आल्यानंतर सयाजीराव महाराजांनी तिन्ही अधिकाऱ्यांना मनुव्हर्ससाठी ग्वाल्हेरला जाण्याचा आदेश दिला. त्यानुसार तिन्ही अधिकारी जाण्याची तयारी करत असताना कॅप्टन जनार्दन यांच्याऐवजी बलदेवप्रसाद पाठक यांना पाठवण्याचा आदेश सयाजीरावांनी दिल्यामुळे जनार्दन सदाशिव यांचा हिरमोड झाला. १६ फेब्रुवारी १९०५ रोजी महाराजांच्या आज्ञेनुसार नानासाहेब, केशवराव सावंत आणि बलदेवप्रसाद ग्वाल्हेरला गेले.

सुमारे १५ दिवसांच्या मनुव्हर्समध्ये नानासाहेबांना अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. १९०२-०३ मध्ये दिल्ली दरबारावेळी शिंदे महाराजांशी झालेली नानासाहेबांची मैत्री या दौऱ्यावेळी पक्की झाली. मनुव्हर्स पूर्ण झाल्यानंतर ग्वाल्हेरचे ताबूत पाहण्यासाठी शिंदे महाराजांनी बडोद्याच्या या तिन्ही अधिकाऱ्यांना आठवडाभर ठेवून घेतले; परंतु शिंदे महाराजांचा पाहुणचार घेत विविध विभागांची माहिती करून घेण्यात दंग असणाऱ्या या अधिकाऱ्यांना बडोद्यास लवकर

परत पाठविण्यासाठी सयाजीराव महाराजांनी तार पाठवली. त्यामुळे त्यांना तातडीने परत बडोद्यास यावे लागले. बडोद्यास परतल्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नानासाहेब आणि केशवराव सयाजीरावांना भेटायला गेले. तेव्हा महाराजांनी या दोघांना आपल्यासोबत फिरायला नेले. तेव्हा रस्त्यात महाराजांनी दोघांकडून ग्वाल्हेरमध्ये नवीन पाहिलेल्या आणि शिकलेल्या गोष्टींची माहिती घेतली. त्यानंतर २८ मार्च १९०५ रोजी नानासाहेबांना दुसऱ्या पलटणीमध्ये व केशवरावांना दी गार्डसमध्ये कमांडिंग ऑफिसरच्या पदावर नियुक्त करण्यात आले. पुढे नानासाहेबांनी या मनुव्हर्सची हकीकत सयाजी विजयच्या मराठी अंकातून क्रमशः प्रसिद्ध केली होती. तसेच नानासाहेबांनी या दौऱ्याचा इंग्रजी भाषेतील अहवालसुद्धा सेनापती खात्यामार्फत सयाजीराव महाराजांना सादर केला होता.

पुढे १९२० मध्ये पुन्हा महाराजा माधवराव शिंदेंच्या खास आग्रहावरून नानासाहेब दोन महिन्यांची रजा घेऊन ग्वाल्हेरच्या फौजेचे मनुव्हर्स (लष्करी संचलन) पाहण्यासाठी गेले. या मनुव्हर्सवेळी नानासाहेबांनी पंच या नात्याने दिलेले अहवाल माधवराव महाराजांना फारच आवडले. त्या अहवालांबद्दल माधवराव महाराजांनी नानासाहेबांची अनेक वेळा प्रशंसा केली. अशा प्रकारचे मनुव्हर्स बडोद्यासही सुरू करावे असे सयाजीराव महाराज वारंवार नानासाहेबांना सांगत. परंतु त्यावेळी नानासाहेब हे केवळ कर्नल पदावर कार्यरत होते. दोनच वर्षांत ऑक्टोबर

१९२२ मध्ये ॲक्टिंग जनरल म्हणून निवड झाल्यानंतर फेब्रुवारी १९२३ पासून नानासाहेबांनी बडोदा फौजेचे मनुव्हर्स घेण्यास सुरुवात केली.

पहिल्या वर्षी झालेल्या मनुव्हर्सचा अहवाल छापून त्याची एक प्रत नानासाहेबांनी महाराजा माधवराव शिंदेंना पाठवली. माधवराव महाराजांनी हा संपूर्ण अहवाल वाचून योग्य त्या सूचना करत नानासाहेबांना अभिनंदनपर पत्र लिहिले. पुढे दरवर्षी फेब्रुवारीमध्ये मनुव्हर्स घेऊन नानासाहेब त्याचा अहवाल छापून प्रसिद्ध करत. ग्वाल्हेरच्या फौजेपेक्षा बडोदा फौजेतील अधिकाऱ्यांचा सुशिक्षितपणा आणि युद्धशास्त्रावरील इंग्रजी ग्रंथ वाचण्याची त्यांची सवय यामुळे पुढे मनुव्हर्सचे काम सुलभ पद्धतीने होऊ लागल्याचे मत नानासाहेबांनी नोंदवले आहे. बडोदा फौजेचे मनुव्हर्स पाहून खूश झालेल्या अनेक युरोपियन अधिकाऱ्यांनी दिवाणांजवळ नानासाहेबांचे कौतुक केले.

## बडोदा लष्करातील सुधारणा

बडोद्याच्या फौज खात्यातील ड्रेसी फौजेसाठीचे नियम व्यवस्थितरीत्या तयार करण्यात आले नव्हते. चिटणीस अनंत खंडेराव शिंदे यांच्या हाताखाली दोन स्वतंत्र कारकून देऊन हे नियम आपल्या देखरेखीखाली तयार करून घेण्याची जबाबदारी मिलिटरी सेक्रेटरी पाडगावकरांवर सोपवण्यात आली; परंतु दोन वर्षांमध्ये हे नियम तयार होऊ शकले नाहीत. अखेर तत्कालीन दिवाण केरशारपजी यांनी ड्रेसी खात्याचे नियम तयार न

झाल्यास मिलिटरी सेक्रेटरीचा पगार थांबवण्याचा आदेश दिला. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या पाडगावकरांनी हे नियम तयार करण्याची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती नानासाहेब आणि केशवरावांना केली. त्यानुसार जुने हुजूर हुकुम व वटहुकुम एकत्र करण्याची आणि किंग्ज रेग्युलेशन, आर्मी रेग्युलेशन इ. इंग्रजी ग्रंथातून घ्यावयाची कलमे पेन्सिलीने एकत्र लिहून देण्याची जबाबदारी सावंतांनी स्वीकारली; परंतु प्रत्यक्ष नियम लिखाणाचे काम नानासाहेबांनीच करावे अशी अट केशवरावांनी घातली. नानासाहेबांना ही अट मान्य करावी लागली.

नियम लिखाणाचे काम सुरू करताना दोन वर्षांत पाडगावकरांनी केलेले काम पाठवण्याची विनंती नानासाहेबांनी केली असता 'आजवर एक ओळही लिहिली नसल्या'चे त्यांनी कळवले. केशवरावांनी कबूल केल्याप्रमाणे आपली जबाबदारी पार पाडली. नानासाहेब आणि केशवराव एकमेकांच्या जवळच राहत असल्यामुळे हे काम करणे सोपे झाले. पलटणीची जबाबदारी सांभाळत नानासाहेबांनी तीन महिन्यांत ड्रेसी फौजेच्या नियमांचा मसुदा तयार केला. या मसुद्याची चिकित्सा करण्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना करण्यात आली होती. मसुद्याची चिकित्सा करून समितीने या मसुद्याला संमती दिल्यानंतर हे नियम छापण्यात आले. या नियमांचे प्रत्येकी अडीचशे पानांचे दोन खंड तयार झाले. विशेष बाब म्हणजे पाडगावकरांच्या स्नेहाखातर आणि खात्याची सुधारणा व्हावी या प्रेरणेने नानासाहेब आणि केशवरावांनी हे काम विनामोबदला पूर्ण केले.

## लष्करातील सहकार चळवळीचा पहिला ‘प्रयोग’

नानासाहेब दुसऱ्या पलटणीचे कमांडिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असताना सयाजीराव महाराजांनी बडोदा लष्कराच्या प्रत्येक पलटणीमध्ये सहकारी वखार (Cooperative Stores) स्थापन करण्याचा आदेश दिला. तत्कालीन जनरल गॉर्डन यांनी सर्व कमांडिंग ऑफिसरना सहकारी वखारीची कल्पना समजवून सांगितली; परंतु या योजनेची अंमलबजावणी करण्यास कोणीही तयार झाले नाही. जनरल गॉर्डन आणि मिलिटरी सेक्रेटरी पाडगावकर यांनी नानासाहेबांना त्यांच्या अखत्यारीतील पलटणीमध्ये सहकारी वखार काढावी असा आग्रह केला. नानासाहेबांनी त्यांचा हा आग्रह मान्य केला. संस्थानचे अधिकारी आणि सहकार चळवळीचे जाणकार समर्थ यांच्याकडून नानासाहेबांनी आवश्यक ती माहिती घेऊन आपल्या पलटणीमध्ये सहकारी वखारीची स्थापना केली.

पलटणीमधील प्रत्येक शिपायाकडून एक रुपया भागभांडवल गोळा करण्यात आले, तर अधिकारी व्यक्तींकडून ठराविक रक्कम घेण्यात आली. सहकारी वखारीसाठीचे नियम तयार करून त्यांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कार्यकारी मंडळाची स्थापना करण्यात आली. पहिल्या महिन्यात केवळ घाऊक बाजारात धान्य खरेदी करून बाजारभावाप्रमाणे विकण्यात आले. काही दिवसांनी या वखारीत तेल, तूप, साखर, गुळ, मीठ, मसाला, पीठ इ. किरकोळ वस्तूही विक्रीस ठेवण्यात

आल्या. या वखारीला बराच आर्थिक नफा मिळत होता. ही वखार सुमारे दोन वर्षे कार्यरत होती. नानासाहेबांच्या बदलीनंतर नवीन येणारा कमांडिंग ऑफिसर ही वखार चालवू शकणार नसल्यामुळे वखार बंद करून हिशेबाप्रमाणे लोकांना त्यांचे पैसे नफ्यासह परत देण्याचा आदेश वरिष्ठांनी दिला. त्यानुसार या वखारीचा हिशेब पूर्ण करून ती बंद करण्यात आली. प्रत्येक शिपायास गुंतवलेल्या १ रुपयापाठीमागे १ रुपया नफा मिळाला.

## परदेशात उच्चशिक्षणाची दवडलेली संधी

सप्टेंबर १९०५ मध्ये परदेश दौऱ्यावर असताना सयाजीराव महाराजांनी लष्करातील ५ अंमलदारांना परदेशी पाठवण्याचा आदेश दिला. या पाच अधिकाऱ्यांमध्ये नानासाहेबांचा समावेश होता. या आदेशात सयाजीराव लिहितात, “या अंमलदारांनी मुख्यत्वे करून युरोप देशात व काही दिवस इजिप्तमध्ये प्रवास करून तेथील लोकस्थिती, राजकीय स्थिती व निरनिराळ्या प्रकारच्या संस्था यांची चांगली माहिती करून घ्यावी. असे केल्याने आपल्या लोकांत योग्य शिक्षणाचा प्रसार होऊन एकंदर देशास पुष्कळ प्रकारे फायदा होण्याचा संभव आहे. येथे ज्या संस्था पाहावयाच्या त्यात नाटक वगैरे करमणुकीच्या संस्थांचाही समावेश होतो, असे समजावे. कारण त्यापासूनही एकप्रकारचे शिक्षण मिळते. आपल्या देशातील अशा संस्थांतून योग्य सुधारणा इकडील दिशेवर होण्याची जरुरी आहे. मात्र अशा करमणुकीच्या बाबतीत या अंमलदारांनी मर्यादेबाहेर खर्च करू नये.

या अंमलदारांत योग्य देशाभिमान व ज्ञान मिळविण्याची खरी इच्छा असेल, तर हे अंमलदार बनेल तितक्या कमी खर्चात ही मुशाफिरी करून त्याचा योग्य लाभ स्वतः करून घेतील व आपल्या देशबांधवांसही करून देतील, अशी आमची खात्री आहे.”

महाराजांच्या आदेशानुसार लष्करी अंमलदारांचा हा परदेश प्रवास ४-५ महिन्यांसाठीचा होता; परंतु या दौऱ्यासाठी बडोदा सरकारकडून देऊ करण्यात आलेली मदत कमी असल्यामुळे प्रत्येकी दीड ते दोन हजार रुपयांचा खर्च अंमलदारांना करावा लागणार होता. कुटुंबवत्सल नानासाहेबांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसल्यामुळे आपल्या परदेश दौऱ्यासाठी कर्ज काढणे त्यांना प्रशस्त वाटले नाही. त्यामुळे आपल्याला परदेश दौऱ्यावर जाणे शक्य नसल्याचे नानासाहेबांनी २० ऑक्टोबर १९०५ रोजी पत्राद्वारे महाराजांना कळवले. नानासाहेब आणि केशवराव सावंतांनी नकार दिल्यामुळे त्यांच्याऐवजी अन्य लष्करी अंमलदारांना पाठवण्यात आले. यानंतर नानासाहेबांना पुन्हा बडोदा सरकारच्या शिष्यवृत्तीवर शिक्षणासाठी परदेशी जाण्याची संधी मिळू शकली नाही. १९३९ मध्ये सेवानिवृत्तीनंतर नानासाहेब स्वखर्चाने युरोप प्रवासाला गेले.

## धारी पलटणीचा कायापालट

१९०८ मध्ये फौज खात्यात ब्रिगेड मेजरचे स्वतंत्र पद निर्माण करण्यात आले. जनरल गॉर्डन यांनी नानासाहेबांची या पदासाठी शिफारस केली; परंतु 'मिलिटरी सेक्रेटरी पाडगावकर हे नानासाहेबांचे स्नेही असल्यामुळे ही शिफारस करण्यात आली' असे काही विघ्नसंतोषी व्यक्तींनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविले. अखेर सयाजीराव महाराजांनी या संदर्भात निर्णय देताना ब्रिगेड मेजरच्या पदावर कॅप्टन हार्डी यांची नेमणूक करून नानासाहेबांना धारी पलटणीवर ॲक्टिंग कॅप्टन म्हणून जाण्याचा आदेश दिला. अमरेली प्रांतातील धारी नावाच्या सरहद्दीवरील तालुक्याच्या गावामध्ये गीर जंगलात बडोदा सरकारची एक पलटण ठेवण्यात आली होती. एका अर्थाने आपली बडोद्याहून उचलबांगडी करण्यात आल्याची भावना नानासाहेबांच्या मनात निर्माण झाली. तसेच महाराज शिंदेवर नाराज झाल्यामुळे ही बदली करण्यात आल्याची अफवा बडोद्यात पसरली होती. अनेक व्यक्तींनी बदली तहकूब करण्यासाठी महाराजांची भेट घेण्याचा सल्ला नानासाहेबांना दिला; परंतु आज्ञाधारक नानासाहेबांनी हा सल्ला नाकारत महाराजांच्या हुकुमानुसार धारीस जाणार असल्याचे स्पष्टपणे सांगितले.

धारीस जाण्याआधी नानासाहेब महाराजांना भेटण्यासाठी राजवाड्यावर गेले. त्यावेळी नानासाहेबांची धारीला बदली का केली आहे आणि तेथे गेल्यानंतर त्यांनी कसे वागणे अपेक्षित

आहे याबद्दल सयाजीरावांनी त्यांना सूचना दिल्या. त्याचवेळी या बदलीमागील खरे कारण स्वतः सयाजीराव महाराजांनी नानासाहेबांना सांगितले. नानासाहेबांची नियुक्ती होण्यापूर्वी धारी पलटणीवर युरोपियन किंवा युरेजियन अधिकारीच कॅप्टन म्हणून पाठवले जात. ही परंपरा खंडित करून तेथे भारतीय कॅप्टन पाठवण्यासाठी नानासाहेबांची नियुक्ती करण्यात आली होती. अशा प्रकारे नानासाहेब धारी पलटणीवर कॅप्टन म्हणून नेमणूक झालेले पहिले भारतीय अधिकारी ठरले. विशेष बाब म्हणजे धारी पलटणीवरील नानासाहेबांच्या नियुक्तीवर बडोद्याच्या रेसिडंटनेसुद्धा आक्षेप घेतला होता. नानासाहेबांनी भेट घेऊन त्यांचा आक्षेप दूर केला.

धारी येथील पलटणीमध्ये कोकणातील शिपायांची संख्या जास्त होती. या शिपायांना दारूचा शौक जास्त असल्यामुळे त्यांचा सर्व पगार दारूवरच खर्च होत असे. नानासाहेबांनी धारीतील दारूच्या गुत्त्यावर पहारा बसवून दारू घेण्यास येणाऱ्या शिपायांना पकडून आणण्याचा आदेश दिला. त्यामुळे ८ दिवसांतच पलटणीतील दारू पिणाऱ्या शिपायांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली. परंतु नानासाहेबांच्या आदेशामुळे दारूविक्री कमी झालेल्या दुकानदाराने प्रांताच्या सुभ्याकडे अर्ज करून पलटणीवर आलेल्या नवीन कप्तानाने दारूबंदी केल्यामुळे शासकीय महसूल भरण्यास असमर्थ असल्याचे कळवले. यावर प्रांताच्या अधिकाऱ्यांनी नानासाहेबांना पत्र लिहून दारूबंदीमुळे

शासकीय महसुलाचे नुकसान होत असल्यामुळे पलटणीच्या लोकांना दारू खरेदी करण्यास आणि पिण्यास परवानगी देण्यास सांगितले. त्यावर दारूचे दुकान गावात असून पलटणीतील शिपायांनी दारू पिऊन गावात दंगा करावा असे वाटत असल्यास तसा लेखी हुकुम पाठवण्यास नानासाहेबांनी पत्राद्वारे कळवले. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कोणतेही उत्तर आले नाही.

गावातील गुजराती लोक दारूला शिवतसुद्धा नसल्यामुळे दुकानदाराचा व्यवसाय पूर्णपणे पलटणीतील शिपायांवरच अवलंबून होता. अखेर आपला व्यवसाय बंद झाल्यामुळे दुकानदार दुकान कायमस्वरूपी बंद करून निघून गेला. नानासाहेब धारीस असेपर्यंत पुन्हा दारूचे दुकान चालू झाले नाही. त्याचवेळी नानासाहेबांनी शिपायांना बचतीची सवय लावली. त्यामुळे शिपायांनी धारी पोस्टल सेव्हिंग बँकेत बचतीची रक्कम ठेवण्यास सुरुवात केली. त्यासाठी सुमारे ३००-४०० नवीन खाती या बँकेत उघडण्यात आली. ५ वर्षांच्या कालावधीनंतर ४ जानेवारी १९१० रोजी नानासाहेबांना कॅप्टनपदी नियुक्त करण्यात आले.

धारी येथे कार्यरत असताना नानासाहेबांच्या पत्नीची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली होती. त्यामुळे त्यांचे हिंडणे-फिरणे देखील बंद झाले होते. आपली बदली बडोद्यास झाल्यास पत्नीचा उपचार चांगल्या पद्धतीने करता येईल अशी आशा नानासाहेबांना वाटत होती. त्याचवेळी कॅप्टन हार्डी

यांच्या सोयीसाठी महाराजांनी त्यांची धारीस बदली करून नानासाहेबांची बडोद्यात नेमणूक केली. स्वतः होऊन सरकारकडे कधीही बदली मागायची नाही हा नानासाहेबांचा निश्चय होता. सुदैवाने सयाजीरावांनी केलेली त्यांची बदली पथ्यावरच पडली. १४ मे १९१० रोजी नानासाहेबांनी बडोद्यातील फर्स्ट कॅव्हलरीचा चार्ज घेतला.

## 'बडोदा डिसिप्लीन ॲक्ट'मध्ये सुधारणा

जनरल बर्डवूड यांच्या शिफारशीवरून सयाजीराव महाराजांनी नानासाहेबांना ब्रिगेड मेजरच्या पदावर बढती दिली. नानासाहेब ब्रिगेड मेजर म्हणून कार्यरत असताना 'बडोदा डिसिप्लीन ॲक्ट' दुरुस्त करण्याबाबतची चर्चा सुरू झाली. तेव्हा नानासाहेबांनी उत्स्फूर्तपणे ही जबाबदारी स्वीकारली. त्यांनी केशवराव सावंतांना या कामात मदतीसाठी घेतले. दोन महिन्यांच्या परिश्रमाने नानासाहेबांनी केशवरावांच्या मदतीने हा कायदा नव्याने इंग्रजीमध्ये तयार केला. हा कायदा वाचल्यानंतर प्रभावित झालेल्या जनरल बर्डवूड यांनी 'युरोपियन ऑफिसरासही असा कायदा तयार करता आला नसता' अशा शब्दांत दोघांचे कौतुक केले. हा कायदा संमतीसाठी सरकारकडे पाठवताना बर्डवूड लिहितात, "Both these officers deserves the highest praise for the keep interest they manifested in this work of revision. They have removed a great want felt by the Department of placing on records the

service rendered by these two officers." बर्डवूड यांनी केलेले कौतुकच नानासाहेब आणि केशवरावांच्या कष्टाची साक्ष देते.

बडोदा लष्करातील अनेक सुधारणांमध्ये नानासाहेब आणि केशवराव सावंत या जोडीने महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. प्रत्यक्ष नोकरीव्यतिरिक्त सयाजीरावांकडून सोपवण्यात आलेल्या अनेक जबाबदाऱ्या दोघांनी पार पाडल्या. खात्यांतर्गत अथवा महाराजांच्या इच्छेने कोणतेही विशेष काम निघाल्यास ते नानासाहेब-केशवराव जोडीकडे सोपवण्याचा रिवाजच पडला होता. शिंदे-सावंतांच्या जोडीने बडोदा लष्करात अनेक सुधारणा करत सरकारचा हजारो रुपयांचा फायदा करून दिला.

## कर्मकांडमुक्त व्यक्तिमत्त्व

पहिल्या पत्नींच्या निधनानंतर मित्रमंडळींनी केलेल्या आग्रहामुळे नानासाहेबांनी फेब्रुवारी १९१३ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील तुलासनी गावच्या सुर्वेंच्या घराण्यातील मुलगीशी विवाह केला. या मुलीची एक आत्या तंजावरच्या शेवटच्या राजाची राणी होती. रिवाजाप्रमाणे विवाहानंतर दुसऱ्या पत्नीचे राधाबाई असे नामकरण करण्यात आले. कोणत्याही विधींचे स्तोम न माजवता नानासाहेबांनी अत्यंत साधेपणाने हा विवाह केला. आपल्या धार्मिक श्रद्धांविषयी नानासाहेब लिहितात, "मी रोज देवपूजा करीत नसे, किंवा निजताना काही प्रार्थनाही करीत नसे. मी नास्तिक नसून ईश्वर

आहे, ही गोष्ट मानणारांपैकी आहे; परंतु नुसत्या मूर्तीची पूजा केली म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो, असे मानणाऱ्यांपैकी मी नाही. मी केव्हाही ब्राह्मणांच्या पाया पडत नाही. विद्वान असल्यास त्यास नमस्कार करतो. वडील माणसांच्या मात्र पाया पडण्यात माल अभिमान वाटतो. मी केव्हाही उपवास करीत नाही. घरातील मंडळींनी उपवास केल्यास मी त्यास बिलकूल हरकत करीत नाही. त्या दिवशी मीही फराळाचे खातो. माझी दोन्ही कुटुंबे दररोज देवाची पूजा करीत असत, त्यास माझी बिलकूल हरकत नसे. स्त्रियांनी कुलाचार व देवधर्म पाळावा. कुटुंबाने सत्यनारायण केल्यास मी केव्हाही पूजेस बसत नाही. त्यास ब्राह्मण न मिळाल्यास सत्यनारायणाची पोथी वाचून दाखविण्यास माझी केव्हाही हरकत नसते. मला बरेच अभंग तोंडपाठ येतात, ते मी नेहमी फुरसतीच्या वेळी मनामध्ये गुणगुणतो, गुरू करून त्यांच्या मागे मी केव्हाही धावलो नाही. हे लोक लुच्चे, लफंगे, भोंदू व ढोंगी असतात, असा माझा अनुभव आहे. जसा ज्योतिषावर माझा भरवसा नाही, तसाच अशा लोकांवरही माझा बिलकूल भरवसा नाही.” नानासाहेबांच्या कर्मकांडमुक्त व्यक्तिमत्त्वाचा वरील आशय महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या व्यक्तिमत्त्वाशी कमालीचा मिळताजुळता आहे.

## सयाजीराव महाराजांचे ए.डी.सी.

१ मे १९१५ रोजी नानासाहेबांची सेकंड लान्सरमधून थर्ड कॅव्हलरीमध्ये मेजरपदी बदली करण्यात आली. या रिसाल्यात नानासाहेब दीड वर्षे कार्यरत होते; परंतु तेथे त्यांचे मन रमले नाही. नानासाहेबांची आधीची उमेद खचून गेली होती. त्यांची ही स्थिती लक्षात आल्यावर सयाजीराव महाराजांनी जानेवारी १९१७ मध्ये नानासाहेबांना सीनिअर ए.डी.सी. म्हणून आपल्या स्टाफवर घेतले.

सकाळी ९ वाजता सुरू झालेले ए.डी.सी.चे काम दुसऱ्या दिवशी ९ वाजता संपत असे. सकाळी व संध्याकाळी ए.डी. सी.ना महाराजांबरोबर लष्करी गणवेशात बाहेर जावे लागे. रात्री १२ वाजल्यानंतर लष्करी गणवेशात राजमहालाचे पहारे तपासावे लागत, तर दुपारच्या वेळी अंगरखा, पागोटे अथवा फेटा या गणवेशात हजर राहावे लागे. महाराज काम करत असताना किती तास काम चालले याची कल्पना दर तासाला महाराजांना द्यावी लागे. तसेच किरकोळ टिपणे महाराजांना वाचून दाखवावी लागत. सकाळी-संध्याकाळी महाराजांना भेटावयास येणाऱ्या व्यक्तींना सयाजीरावांना भेटवण्याचे कामदेखील त्यांना करावे लागे. सवडीच्या वेळात महाराजांना वर्तमानपत्र वाचून दाखवण्याची आणि अभ्यासाच्या वेळी महाराजांनी टिपून ठेवलेल्या शब्दांचे अर्थ डिक्शनरीमधून लिहून ठेवण्याची जबाबदारीदेखील त्यांना पार पाडावी लागत असे.

महिन्यातून दोन-तीन वेळा लेफ्टनंट लोकांना ए.डी.सी. पदाचा कार्यभार सांभाळावा लागे. परंतु बरेच अधिकारी कामचुकारपणा करत असल्यामुळे विशेष समारंभावेळी सयाजीराव कार्यतत्पर अधिकाऱ्यांनाच ए.डी.सी. म्हणून सोबत नेत.

सीनिअर ए.डी.सी. म्हणून नेमणूक होण्यापूर्वी १५ वर्षे १९०२-०३ मध्ये दिल्ली येथे लॉर्ड कर्नल यांनी भरवलेल्या बादशाही दरबाराला सयाजीराव महाराज उपस्थित राहिले. त्यावेळी महाराजांनी सोराबजी, केशवराव सावंत यांच्याबरोबर नानासाहेबांनादेखील ए.डी.सी. म्हणून सोबत नेले होते. तर डिसेंबर १९०३ मध्ये सयाजीरावांच्या द्वारका दौऱ्यावेळी ए.डी.सी. म्हणून नानासाहेब बरोबर गेले होते. विशेष बाब म्हणजे सयाजीराव हे द्वारकेस जाणारे गायकवाड राजवंशातील पहिले महाराज होते.

या दौऱ्यादरम्यान सयाजीरावांनी घडवून आणलेल्या धर्मसुधारणेची आठवण नानासाहेबांनी आपल्या आत्मचरित्रात नोंदवली आहे. नानासाहेब लिहितात, "येथील गुगळी जातीचे ब्राह्मण फार प्रसिद्ध आहेत. मुख्य द्वारकाधीशाच्या पुजाऱ्याची गुगळी जातीच्या ब्राह्मणांची चार घराणी आहेत. त्यांची वर्षातून प्रत्येकी तीन-तीन महिन्यांप्रमाणे पाळी वाटलेली असून, या मुदतीत देवापुढे दक्षणारूपी जे द्रव्य येते, त्यावर त्यांची मालकी असते. पोशाख अगर दागिना देवास कोणी चढविल्यास तो सार्वजनिक म्हणून जमा केला जातो. हे देवाचे ब्राह्मण,

ब्राह्मणाशिवाय इतरास देवाच्या पायाला स्पर्श करू देत नसत. मोठमोठे क्षत्रिय राजे महाराजे द्वारकेस यात्रेस जात असत, त्यासही पदस्पर्श करू देत नसत. दि.ब. समर्थ यांनी ही चाल फार खुबीने मोडली. महाराज साहेबांस गोमतीत स्नान घालून त्यांच्याकडून द्वारकाधीशाची पूजा करविण्याचे ठरविले. महाराज साहेब प्रथम या गोष्टीस कबूल होईनात; परंतु हे करण्याचा मुख्य हेतू काय, हे समर्थांनी समजाविल्यावर महाराज साहेब दोन्ही गोष्टीस कबूल झाले. स्नान केल्यावर पीतांबर नेसून व अंगावर शालजोडी घेऊन महाराज साहेब द्वारकाधीशाच्या पूजेस गेले. महाराज साहेबांबरोबर मी व समर्थ दरबारी पोशाखात, जोड्याशिवाय होतो. महाराज साहेबांनी विधीपूर्वक पूजा केल्यावर देवाच्या पायांस स्पर्श करून नमन केले. आम्ही दोघांनीही पदस्पर्श केला. गुगळी ब्राह्मण काही गडबड करण्याच्या तयारीत होते; परंतु समर्थांनी डोळे वटारताच ते चूप बसले. या दिवसापासून क्षत्रियांस देवाचा पदस्पर्श करण्याच्या कामी हे ब्राह्मण आता हरकत घेत नाहीत.”

द्वारका दौऱ्यात नानासाहेबांनी पार पाडलेल्या उत्तम कामगिरीबद्दल महाराजांनी त्यांचे कौतुक करून एक सोन्याचे घड्याळ, जरीचा भारी दुपेटा आणि कपड्यांसाठी पाचशे रुपये असे बक्षीस दिले. विशेष म्हणजे ए.डी.सी. पैकी असे बक्षीस

मिळवणारे नानासाहेब पहिले व्यक्ती होते. १९०४ मध्ये संपन्न झालेल्या युवराज फत्तेसिंगरावांच्या विवाह सोहळ्यातदेखील नानासाहेबांनी केशवरावांसोबत ए.डी.सी. म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

ए.डी.सी. ची जबाबदारी पार पाडणाऱ्या अंमलदारांना कामाची नीट माहिती नसल्यामुळे त्यांच्याकडून बऱ्याचदा चुका होत. त्यामुळे महाराजांना फार त्रास आणि गैरसोय सहन करावी लागत असे. यावर उपाय म्हणून सयाजीरावांनी ए.डी.सी. च्या कामात मार्गदर्शक ठरतील असे नियम तयार करण्याची आज्ञा नानासाहेब आणि केशवरावांना केली. शिंदे-सावंत जोडीने स्वानुभवानुसार नियम तयार करून महाराजांना वाचून दाखवले. ही नियमावली सयाजीरावांना पसंत पडल्यानंतर १९०४ मध्ये 'ए.डी. कॉंग व त्यांची कर्तव्ये' पुस्तकरूपाने छापण्यात आली. त्यामुळे ए.डी.सी. म्हणून काम करणाऱ्या अंमलदारांना बरीच माहिती मिळून काम करणे सोपे झाले.

ए.डी.सी. ची नोकरी करणाऱ्या अंमलदारांना कपड्यासाठी अधिकच खर्च करावा लागतो. त्यासाठी या अंमलदारांना भत्ता देण्याची सूचना नानासाहेब व केशवरावांनी महाराजांना केली. त्यानुसार काही दिवसांनी सयाजीरावांनी दरमहा ५० रुपये भत्ता देण्यास मंजुरी दिली. पुढे हा भत्ता १०० रु. करण्यात आला.

महाराजांकडे ए.डी.सी. म्हणून काम करणारा व्यक्ती 'Master of All Trades' प्रमाणे अष्टपैलू असणे आवश्यक असल्याचे मत नानासाहेबांनी मांडले आहे. सयाजीरावांच्या ए.डी. सी.बद्दल अन्य एका महाराजांनी काढलेले उद्गार नानासाहेबांनी आपल्या आत्मचरित्रात नोंदवले आहे. नानासाहेब लिहितात, "महाराजांजवळ राहून ए.डी.सी. या नात्याने काम केलेला अंमलदार वाटेल त्या महत्त्वाच्या सरकारी कामास उपयोगी व लायक होतो. एका महाराजांनी एकदा मजजवळ जेवताना असे उद्गार काढले की, "सयाजीराव महाराजांच्या तैनातीत व तालमीत तयार झालेला ए.डी.सी. आमच्यासारख्या लहान संस्थानांत दिवाणाचे काम करण्यास लायक होईल, असे त्याचे शिक्षण असते." या म्हणण्यात फारशी अतिशयोक्ती नाही. महाराजांच्या तैनातीत राहून काम केलेले ए.डी.सी. आज नायबदिवाण, जनरल, कर्नल, मेजर, सुभे व नायब सुभ्यासारख्या मोठ्या दर्जावर आहेत व त्या ठिकाणी ते चांगली कामे करीत आहेत."

लेफ्टनंट दर्जाच्या सर्व अंमलदारांनी आळीपाळीने ए.डी.सी.ची जबाबदारी पार पाडण्याची प्रथा १९०५ पर्यंत सुरू होती. रोज येणाऱ्या निरनिराळ्या अंमलदारांना आधीच्या कामाची माहिती नसल्यामुळे अडचणी निर्माण होत. हा गोंधळ टाळण्यासाठी महाराजांनी तीन नवीन अंमलदारांची कायमस्वरूपी ए.डी.

सी. पदी नियुक्ती केली. १९१७ मध्ये नानासाहेबांची ए.डी.सी. म्हणून नियुक्ती केल्यावर त्यांना नवीन अंमलदारांना कामाची व्यवस्थित माहिती देण्याची आज्ञा महाराजांनी केली. परंतु तीनच महिन्यांनंतर कर्नल निसन यांच्या रिक्त झालेल्या जागेवर ॲक्टिंग कर्नल पदासाठी जनरल बर्डवूड यांनी नानासाहेबांची शिफारस केली. या शिफारशीनुसार महाराजांनी नानासाहेबांची ॲक्टिंग कर्नलपदी नियुक्ती केली.

## कर्नलपदी नियुक्ती

महाराजांच्या आदेशानुसार १ एप्रिल १९१७ रोजी नानासाहेबांनी कॅव्हलरी ब्रिगेडचा चार्ज घेतला. कर्नल पदाचे काम अतिशय कमी असल्यामुळे मिळालेल्या सवडीचा सदुपयोग करत नानासाहेबांनी सेनापती कचेरीतील संपूर्ण ग्रंथालय वाचून काढले. याउलट त्यांच्याबरोबरचे पलटणीचे कर्नल डिव्हिन कचेरीतील चित्रांचे कॅटलॉग पाहण्यात, चिरूट ओढण्यात आणि टाइम्स ऑफ इंडिया वाचण्यात वेळ घालवीत असत. आपल्याला कचेरीत काहीतरी काम द्यावे असा आग्रह नानासाहेबांनी धरला. अखेर दोन्ही कर्नलांना कोणकोणती कामे द्यावेत यासाठीची एक लेखी योजना नानासाहेबांनी सयाजीराव महाराजांना सादर केली. परंतु दुर्दैवाने महाराजांकडून संमती मिळालेली ही योजना अंमलबजावणीसाठी खात्याकडे आल्यानंतर तिला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. यानंतर मात्र नानासाहेबांनी स्वत:ला लेखन-वाचनात गुंतवून घेतले.

सयाजीरावांच्या नात इंदुमती देवी व कोल्हापूरचे राजाराम महाराज यांच्या विवाहावेळी महाराजांनी गणपतराव गायकवाड व नानासाहेब यांच्याकडे वधू पक्षाकडील सर्व व्यवस्था पाहण्याची जबाबदारी सोपवली होती. तर राजपुत्र धैर्यशीलरावांच्या विवाहाप्रसंगी मुख्य विवाह समितीमध्ये सयाजीरावांनी नानासाहेबांची नेमणूक केली, तर राजकन्या लक्ष्मीदेवींच्या विवाहाला धारचे महाराज हे सावंतवाडीच्या राजांचे मेहुणे या नात्याने हजर होते. धारच्या महाराजांची आणि नानासाहेबांची जुनी ओळख असल्यामुळे त्यांनी नानासाहेबांना स्वतःच्या कॅम्पची व्यवस्था पाहण्यासाठी मुद्दाम मागून घेतले.

## 'दिलदार' शाहू महाराज

२५ मे १९१८ रोजी नानासाहेबांची मुलगी शांताबाई हिचा सांगली जिल्ह्यातील डिग्रज येथील उदाजीराव चव्हाण यांचे तृतीय चिरंजीव जीवराव ऊर्फ तात्यासाहेब यांच्याशी कोल्हापूर येथे झाला. या विवाहाची आठवण नोंदवताना नानासाहेब आपल्या आत्मचरित्रात लिहितात, "लग्नसमारंभास कोल्हापूरचे कै. श्री. शाहू छत्रपती महाराज साहेब व महाराणी साहेब व इतर सरदार मंडळी आली होती. आमचे वऱ्हाड इचलकरंजीकरांच्या बंगल्यात उतरले होते.

कोल्हापुरात होणाऱ्या लग्नास महाराज साहेब कधीही वेळेवर येत नाहीत, असा बहुतेक रिवाजच पडलेला होता; परंतु या लग्नास महाराज साहेब ठरलेल्या वेळेस आले व बहुल्याजवळ

उभे राहून त्यांनी वधू-वरांवर अक्षता टाकल्या. लग्न संपताच उभ्या-उभ्याच पोशाख-पानसुपारी व हात-अत्तर घेऊन स्वारी परत गेली. जाताना मी वरातीला जरूर येईन म्हणून महाराज म्हणाले. त्यावर मी विनंती केली की, वरात फार अपरात्री निघेल, करिता सरकारनी श्रम व त्रास घेऊ नये, असे वारंवार सांगितले तेव्हा बरे म्हणून स्वारी गेली. लवाजम्याचे सर्व सामान, मी विनंती करताच फुकट देण्याबद्दल महाराजांनी तोंडी हुकूम दिला." आपल्या मुलीच्या विवाहावेळी शाहू महाराजांनी दाखवलेला दिलदारपणा नानासाहेबांनी येथे प्रांजळपणे अधोरेखित केला आहे.

याचप्रमाणे बडोद्याच्या राज्यकारभारासंदर्भात शाहू महाराजांनी दिलदारपणे दिलेली कबुली आजही आपल्यासाठी 'दिशादर्शक' आहे. या संदर्भात नानासाहेब आपल्या आत्मचरित्रात लिहितात, "आमच्या राज्यकारभारातील उत्तम राज्यकारभार पाहून कोल्हापूरचे महाराज म्हणत असत की, तुमच्या राज्यकारभारास उत्तम सर्कशीचा मोठा तंबू, त्यामध्ये खुर्च्या, बाके, रिंगा वगैरे सामान, उत्तम रिंगमास्तर व काम करणारी उत्तम जनावरे व खिलाडी लागतात; परंतु आमचा राज्यकारभार म्हणजे माळावरील कोल्हाट्याचा खेळ. नुसते ढोलके वाजविले की, काम झाले. आम्हाला तुमची केव्हाही बरोबरी करता येणार नाही." यावरून राजर्षी शाहूंसमोर सयाजीराव महाराजांचा 'आदर्श' होता हे स्पष्ट होते.

## बडोदा फौजेचे पहिले भारतीय जनरल

१९२० च्या दरम्यान बडोदा, कडी आणि अमरेली प्रांतात होणाऱ्या लुटालुटीचा तपास करून योग्य उपाय सुचवण्यासाठी महाराजांनी 'डेकॉयटी कमिशन'ची स्थापना केली. पोलीस कमिशनर मेजर हॉगसन यांच्या अध्यक्षतेखालील या कमिशनमध्ये नानासाहेब, माजी पोलीस कमिशनर बाबूराव चव्हाण आणि वकील गुणवंतराव मुजुमदार यांचा समावेश होता. कथित लुटालुटीच्या तपासाकरिता कमिशनच्या बडोदा, पेटलाद, पाटण, अमरेली इ. ठिकाणी बैठका घेण्यात आल्या. या बैठकांदरम्यान पोलीस बंदोबस्तासंबंधी अनेक त्रुटी उघडकीस आल्या. कमिशनचे अध्यक्ष हे स्वतःच पोलीस कमिशनर असल्यामुळे अनेक बाबींचा त्यांनी स्वतःच्या अधिकारात बंदोबस्त केला, तर आवश्यक त्या बाबी वरिष्ठांच्या लक्षात आणून देऊन योग्य ते आदेश द्यायला लावले. या कमिशनचा अहवाल बऱ्याच दिवसानंतर सयाजीराव महाराजांना सादर करण्यात आला. या कमिशनमध्ये काम केल्यामुळे नानासाहेबांना पोलिसांच्या अंतर्व्यवस्थेसंबंधी बरीच माहिती मिळाली.

कर्नल डिव्हिन सेवानिवृत्ती झाल्यानंतर १० नोव्हेंबर १९२२ रोजी नानासाहेबांची ॲक्टिंग जनरलपदी नियुक्ती करण्यात आली. बडोदा फौजेत सेनापती आणि जनरल अशी दोन अधिकाराची

पदे अस्तित्वात होती. सुरुवातीला सयाजीरावांनी सेनापतीचे काही अधिकार नानासाहेबांकडे व काही अधिकार गणपतराव गायकवाड यांच्याकडे दिले. या अधिकाराच्या विभागणीमुळे जनरलच्या अलाउन्सपैकी अर्धा अलाउन्स आपल्याला मिळावा अशी गणपतरावांनी मागणी केली. यावर नानासाहेबांनीच जनरलचे सर्व अधिकार वापरावेत असा आदेश महाराजांनी दिला. नानासाहेब हे लेफ्टनंटच्या दर्जापासून पायरीपायरीने बढत्या घेत जनरल झालेले पहिले भारतीय होत. त्याचप्रमाणे नानासाहेबांच्या आधी बडोदा फौजेमध्ये १८५० पासून जनरल पदी नेमण्यात आलेले जनरल डिव्हिन, जनरल हार्डी, जनरल निसन, जनरल गॉर्डन, जनरल बर्डवूड इ. सर्व अधिकारी युरोपियन अथवा युरेजियन होते. नानासाहेब बडोदा फौजेचे पहिले भारतीय जनरल होते.

१९२० मध्ये भारतात देशी संस्थानांच्या फौजेच्या पुनर्रचनेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या पुनर्रचनेची योजना सर्व संस्थानिकांस समजावून सांगण्यासाठी ब्रिटिश मेजर जनरल हॅरी वॉटसन यांनी संपूर्ण भारताचा दौरा काढला. १० डिसेंबर १९२१ रोजी वॉटसन यांनी बडोद्याला भेट देऊन नवीन योजना समजावून सांगितली. यावेळी नानासाहेब जनरल पदावर नसतानादेखील त्यांना जनरल बडोदा फौजेचे निसन यांच्याबरोबर उपस्थित राहण्याची

आज्ञा सयाजीरावांनी केली. त्यानुसार नानासाहेब ऐनवेळी या बैठकीस उपस्थित राहिले.

बडोदा फौजेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी आणि शिपायांना पगाराच्या मानाने कमी पेन्शन मिळत असल्याची ओरड सातत्याने होत असे. बडोद्याच्या ॲक्टिंग जनरलपदी निवड झाल्यानंतर नानासाहेबांनी या प्रश्नात लक्ष घातले. अधिकारी आणि शिपायांच्या पेन्शनसंदर्भातील नवीन योजना तयार करून नानासाहेबांनी महाराजांसमोर मांडली. ही योजना अतिशय उत्कृष्ट असल्याने सयाजीरावांनी १९२५ मध्ये परदेश दौऱ्याहून परतल्यानंतर लगेचच मोठ्या आनंदाने मंजूर केली.

ॲक्टिंग जनरल म्हणून काम करत असताना नानासाहेबांनी बडोद्याच्या फौजेत अनेक सुधारणा घडवून आणल्या. एप्रिल १९२४ च्या मॉडर्न रिव्ह्यूच्या अंकात संत निहालसिंह यांचा 'Glimpses of Baroda' हा लेख प्रकाशित झाला. या लेखात निहालसिंह नानासाहेबांचे कौतुक करताना लिहितात, "For the first time in the recent history of the Baroda Army an Indian, Colonel Shinde, a fine figure of a man and a writer on military subjects is in command."

चार वर्षे ॲक्टिंग जनरल पदाची धुरा सांभाळल्यानंतर १३ डिसेंबर १९२६ रोजी नानासाहेबांना जनरल पदावर कायम करण्याचा हुकूम सयाजीराव महाराजांनी दिला. नानासाहेब

बडोदा फौजेचे पहिले भारतीय जनरल होते. हा हुकूम मिळताच दुसऱ्या दिवशी मकरपुऱ्यात महाराजांना भेटून नानासाहेबांनी त्यांचे आभार मानले. यावेळी बोलताना महाराजांनी त्यांचे कौतुक करतानाच त्याआधी इच्छा असतानाही नानासाहेबांना जनरलपदी कायम न करण्यामागील अडचणी समजावून सांगितल्या. 'तुम्ही आमच्या देखरेखीखाली तयार झालेली जुनी माणसे असून तुमच्याकडून आम्हास अद्याप मोठमोठी कामे करून घ्यायची असल्याचे' महाराजांनी त्यांना सांगितले. जनरलपदी नियुक्तीच्या बातम्या मराठी, गुजराथी व इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध होताच संस्थानाबाहेरील अनेक व्यक्तींनी नानासाहेबांचे पत्राद्वारे अभिनंदन केले. अनेक वर्तमानपत्रांमध्ये नानासाहेबांचा अल्पपरिचय प्रसिद्ध करण्यात आला. बडोद्याचे प्रसिद्ध मराठी शाहीर रा. यादवराव पवार यांनी नानासाहेबांवर कविता करून त्या जनतेत वाटल्या.

## पूरस्थितीत मदतकार्य

२४ जुलै १९२७ रोजी अचानकपणे आलेल्या धुवांधार पावसाने केवळ ८ तासांच्या कालावधीत बडोदा शहरात पूरस्थिती निर्माण झाली. यावेळी नानासाहेबांनी रात्रभर अधिकाऱ्यांना सूचना देऊन पुरात अडकलेल्यांना लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. रात्री २ च्या सुमारास पलटणीच्या वसाहतीत छातीइतके पाणी आल्यामुळे नानासाहेब तेथे जाण्यास निघाले. परंतु

पाण्याला वेग जास्त असल्यामुळे पट्टीचा पोहणारा एक शिपाई राजमहालाच्या लोखंडी गजाला जाऊन धडकला. त्या शिपायाने विरोध केल्यामुळे नानासाहेब गेले नाहीत. पहाटे ५ वाजता सर्वत्र फिरून नानासाहेबांनी परिस्थितीचा आढावा घेतला. छातीपर्यंतच्या पाण्यातून लोक लष्करी शिपायांच्या साहाय्याने आपले सामान बाहेर काढत होते. पलटणीचे अंमलदार आणि शिपायांनी केलेल्या मदतीमुळे सुदैवाने एकही व्यक्ती या पुरात दगावली नाही. नानासाहेबांनी सर्व लोकांना धीर देत अन्नपदार्थ वाटण्यासाठी तात्काळ सरकारी मदत उपलब्ध करून दिली.

## बडोदा फौजेचे वार्षिक इन्स्पेक्शन

जनरलपदी कायम झाल्यानंतर नानासाहेबांनी दरवर्षी मार्च महिन्यात फौजेचे वार्षिक इन्स्पेक्शन करण्यास सुरुवात केली. मार्च १९२८ मध्ये होणारे इन्स्पेक्शन स्वतः पाहणार असल्याचा आदेश महाराजांनी दिला. त्यामुळे सयाजीरावांच्या सवडीनुसार आणि सूचनेनुसार इन्स्पेक्शनचे वेळापत्रक तयार करण्यात आले. आठ दिवस सयाजीराव दररोज सकाळी लष्करी गणवेशात तपासणीस सुरुवात करत. फौजेचे इन्स्पेक्शन पूर्ण होताच खूश झालेल्या सयाजीराव महाराजांनी नानासाहेबांच्या देखरेखीचे आणि त्यांनी हाताखालील अंमलदारास दिलेल्या प्रशिक्षणाचे कौतुक केले. याचवेळी त्या वर्षीच्या वाढदिवसाच्या दरबारात नानासाहेबांना ‘राजरत्न’ पदवीचा सोन्याचा चांद

आणि केशवराव सावंतांना चांदीचा चांद देण्याची घोषणा सयाजीरावांनी केली. त्याप्रमाणे राजदरबारात राजरत्न किताब देतानाच महाराजांनी नानासाहेबांच्या नोकरीची मुदत एक वर्षांनी वाढवली. विशेष बाब म्हणजे बडोदा फौजेच्या इतिहासात नानासाहेबांच्या आधी कोणत्याही जनरलला हा मान मिळाला नव्हता.

फौज खात्यातील इन्स्पेक्शनची पद्धत सयाजीराव महाराजांना खूप आवडली. याच पद्धतीने सर्व खात्यांची तपासणी व्हावी यासाठी इन्स्पेक्शन पद्धतीची माहिती इतर खात्यातील अधिकाऱ्यांना देण्याची आज्ञा महाराजांनी नानासाहेबांना दिली. त्यानुसार नानासाहेबांनी इतर खात्यातील अधिकाऱ्यांना तपासणीच्या पद्धतीची माहिती दिली. त्यानंतर सयाजीराव महाराज, दिवाण आणि नायब दिवाणांनी सर्व खात्यांची तपासणी केली. प्रत्येक खात्याच्या तपासणीवेळी नानासाहेब हजर होते. अखेर या तपासणीसाठीचे नियम तयार करण्याची आज्ञा महाराजांनी नानासाहेबांना दिली. नानासाहेबांनी तयार केलेल्या या नियमांची तात्काळ अंमलबजावणी करण्यास सयाजीरावांनी मान्यता दिली.

१९२९ च्या अखेरीस नानासाहेबांनी वरील मुदत पूर्ण होण्यापूर्वी नोकरीतून निवृत्ती करण्याची विनंती पत्राद्वारे महाराजांना केली. यावर महाराजांनी नानासाहेबांना आणखी एक वर्ष आणि केशवरावांना दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा स्वहस्ताक्षरात आदेश दिला. या आदेशामुळे फौजेतील इतर अंमलदारांमध्ये प्रचंड

खळबळ उडाली. पुढे १९३० ते १९३४ अशी पुढील ४ वर्षे सयाजीरावांनी नानासाहेबांना नोकरीत मुदतवाढ दिली.

## मानसन्मान

बडोद्यात स्थापन करण्यात आलेल्या स्थानिक मराठी वाङ्मय परिषदेच्या दोन अधिवेशनांचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही परिषदांच्या स्वागताध्यक्षपदी नानासाहेबांची निवड करण्यात आली, तर डिसेंबर १९३४ मध्ये बडोद्यात झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद नानासाहेबांनी भूषवले. यावेळी नानासाहेबांनी केलेल्या भाषणाचे उपस्थितांनी भरपूर कौतुक केले. या संमेलनात पाहुण्यांसाठी बडोदा फौजेची परेड ठेवण्यात आली होती. परेड पाहून उपस्थित पाहुणे प्रचंड खूश झाले. या परेडीचे अनेक वृत्तपत्रांनीदेखील कौतुक केले.

१९३४ मध्ये बडोद्यातील 'मराठा समाजा'च्या अध्यक्षपदी नानासाहेबांची निवड करण्यात आली. नानासाहेबांच्या अध्यक्षतेखाली या संस्थेने ८ हजार रुपयांत जागा खरेदी करून तेथे मराठा जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी 'मराठा बोर्डिंग' बांधण्याचा संकल्प सोडण्यात आला. २ वर्षांनंतर १९३६ मध्ये युवराज प्रतापसिंह यांच्या हस्ते मराठा बोर्डिंगच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी नानासाहेब 'मराठा समाजा'चे अध्यक्ष म्हणून या कार्यक्रमास उपस्थित होते.

२४ ते २६ जानेवारी १९३५ दरम्यान दिल्ली येथे झालेल्या हिंदुस्थानी फौजेच्या मनुव्हर्सला नानासाहेब बडोदा संस्थानचे

प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी कर्नल भाऊसाहेब गायकवाड, मेजर रामचंद्रराव चव्हाण, मेजर काद्री आणि लेफ्टनंट युसूफखान या अंमलदारांना सोबत नेले होते. या मनुव्हर्समध्ये नानासाहेबांना लष्करी पेशासंबंधी अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. या अनुभवावर आधारित नानासाहेबांचा 'दिल्लीजवळील लटकी लढाई' नावाचा लेख सहविचार नियतकालिकात प्रसिद्ध झाला.

मनुव्हर्स संपल्यानंतर २८ ते २९ जानेवारी १९३५ या कालावधीत दिल्लीमध्ये ब्रिटिश भारतातील जंगली प्राणी, पक्षी, मासे आणि वनस्पती यांच्या संवर्धनासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी परिषद भरवण्यात आली होती. या परिषदेस नानासाहेब बडोदा संस्थानचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले. तर याच वर्षी ६ मे १९३५ रोजी नानासाहेबांना बडोदा राजदरबारात 'दी किंग्ज सिल्व्हर ज्युबिली मेडल' किताबाने सन्मानित करण्यात आले.

## नानासाहेबांच्या आठवणीतले महाराजा सयाजीराव

नानासाहेबांनी बडोदा फौजेत ४१ वर्षे नोकरी केली. लेफ्टनंट पदापासून सुरुवात करून पदोन्नतीने जनरल पदापर्यंत पोहोचलेले नानासाहेब पहिले जनरल होते. आपल्या या कारकिर्दीत त्यांनी बडोद्याचा झालेला कायापालट प्रत्यक्ष अनुभवला होता. सयाजीराव महाराजांच्या काळात बडोद्याच्या झालेल्या विकासाबद्दल नानासाहेब लिहितात, "या चाळीस

वर्षांत बडोद्यामध्ये किती तरी मोठे स्थित्यंतर झाले आहे. या सर्व सुधारणांचा उगम एकाच मोठ्या महान विभूतीपासून आहे की, जी विभूती आज पन्नास वर्षे रयतेच्या सुखाकरिता व राज्याच्या सुधारणेकरिता अहर्निश प्रयत्न करीत आहे. महाराज साहेबांनी युरोपच्या २२ स्वाऱ्यांत जे ज्ञान पाश्चात्त्य राष्ट्रांत पैदा केले, त्याचा उपयोग त्यांनी आपल्या राज्यात केला. एका व्यक्तीच्या प्रयत्नाने पूर्वीच्या बजबजपुरीमधून हल्लीचे बडोदे म्हणजे एक नमुनेदार देशी संस्थान पुढे आले आहे. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे त्या महान विभूतीबद्दल सप्रेम व स्वाभिमान कौतुक वाटावे यात नवल नाही. यक्षिणीच्या कांडीप्रमाणे त्यांनी या सुधारणा केल्या आहेत, अशातला प्रकार नाही, तर लोकांस बरोबर घेऊन त्यांच्याकरिता पन्नास वर्षे सारखे खपून त्यांनी या सुधारणा लोकांच्या सुखाकरिता अमलात आणल्या आहेत.” नानासाहेबांचे हे मनोगत म्हणजे सयाजीराव महाराजांच्या कर्तृत्वाचा ‘जिवंत इतिहास’च आहे.

सयाजीराव महाराजांसारख्या ‘कर्तव्यकठोर’ राजाने सोपवलेली प्रत्येक जबाबदारी त्यांच्या कौतुकास पात्र ठरेल इतक्या प्रभावीपणे पार पाडत नानासाहेब तब्बल ४१ वर्षे बडोदा लष्करात कार्यरत राहिले. महाराजांच्या वैयक्तिक सेवेतील ए.डी. सी. पदासाठीच्या नियमावलीपासून ‘बडोदा डिसिप्लीन ॲक्ट’ मध्ये सुधारणा करण्यापर्यंतच्या महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. धारी पलटणीत आमूलाग्र बदल घडवणाऱ्या नानासाहेबांनी लष्करातील सहकार चळवळीचा पहिला ‘प्रयोग’

यशस्वीपणे राबवला. त्यामुळेच सर्वोत्तम लष्करी सेवेबरोबरच दर्जेदार ग्रंथलेखन करणाऱ्या नानासाहेबांना सयाजीराव महाराजांनी 'राजरत्न' पदवीने सन्मानित केले. आपल्या सभोवतालच्या अधिकाऱ्यांमधील 'आमूलाग्र' बदलास कारणीभूत ठरलेले महाराजा सयाजीराव आणि त्यांची जनतेच्या कल्याणाप्रतीची 'धडपड' ओळखणारे नानासाहेब 'समजून' घेणे आपल्या अज्ञात इतिहासाशी नाते 'जोडणारे' ठरेल.

●●●

# परिशिष्ट १

## जनरल नानासाहेब शिंदे यांची ग्रंथसंपदा

१) हिंदुस्थानचा लष्करी इतिहास आणि दोस्त राष्ट्रांच्या फौजा
२) मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया
३) एका शिपायाचे आत्मवृत्त अथवा लेफ्टनंटपासून जनरलपर्यंत
४) जनरल शिंदे यांचा लेखसंग्रह भाग १
५) जनरल शिंदे यांचा लेखसंग्रह भाग २ रा
६) मी युरोपात काय पाहिले?
७) दसपटीचे शिंदे मोकाशी इनामदार यांचा इतिहास
८) शिस्त
९) सुविचार रत्नमाला (पद्य) भाग १
१०) मराठा समाजांतील काही घातुक चाली
११) मराठ्यांकरिता मध्यवर्ती शिक्षण संस्था
१२) बाना आणि फरिगदका
१३) गार्ड और सेंट्री ड्युटीज
१४) इनफंट्री औटपोस्ट, ॲडव्हान्स्ड और रिअर गार्डस
१५) कॅव्हलरी औटपोस्ट, ॲडव्हान्स्ड और रिअर गार्डस

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Speches & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com